▶ वर्ष–३
■ अंक–२२

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज
आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १ जानेवारी २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com

# दिवा शहराच्या विकासासाठी जे करावे लागेल ते करणार



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिवावासीयांना ग्वाही

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिवा महोत्सव उत्साहात संपन्न



**सुहास खंडागळे**

**दिवा:**–दिवा शहराच्या विकासासाठी जे करावे लागेल ते केले जाईल. मागील काही वर्षात दिवा शहराच्या विकासासाठी राज्य शासन व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला. सुमारे ८०० कोटींची विकास कामे दिव्यात करण्यात आली. दिवा शहरातील अनेक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न झाला. येत्या काळात दिवा शहरासाठी १० एम एल डी अतिरिक्त पाणी वाढवून दिले जाणार असून पाणी प्रश्न ही लवकरच निकालात निघेल असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवा येथे आयोजित दिवा महोत्सव कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केला.

दिवा वासियांच्या प्रेमाने मी भारावून गेलो असून दिवा शहरातून जे प्रेम मला मिळते ते मी कधीच विसरू शकणार नाही अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. दिवा शहरासाठी मेट्रो सुरू करण्यात यावी अशी मागणी रमाकांत मढवी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.यावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कळवा, मुंब्रा, दिवा मार्गे डोंबिवली मेट्रोचे सर्वेक्षण करण्यासाठी एम एम आर डी ए ला सूचना देत असल्याचे यावेळी जाहीर केले.दिवा शहरातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे सांगत दिवा शहराच्या सर्वांगीण विकासाला आपला कायम पाठिंबा असेल असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना चिमटे काढले.धर्मवीर चित्रपटाच्या भाग एक ने काही जणांच्या पोटात गोळा आला होता.आता धर्मवीर पार्ट दोन येत असून यामुळे कुणाचे धाबे दणाणतील असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. जो शब्द दिला होता तो शब्द पूर्ण करत दिव्याचे डंपिंग कायमचे बंद केल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले.दिवा शहरातील रस्ते झाले असून जे रस्ते व्हायचे शिल्लक आहेत तेही लवकर पूर्ण होतील असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. चुहा ब्रिज ते दिवा रस्ता,स्वतंत्र शासकीय रुग्णालय,दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन या बाबीही लवकरच पूर्णत्वास जातील असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी रमाकांत मढवी यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश मस्के, शिवसेनेचे दिवा शहरातील सर्व माजी नगरसेवक व शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १ जानेवारी २०२४
पान : २
www.diwanews.com

# राष्ट्रीय बालरंग फेस्टिव्हलमध्ये लक्षवेधी ठरले तारपा नृत्य!

## एस. व्ही. एम. पब्लिक स्कूल आणि एन. जे. बेलवले कनिष्ठ महाविद्यालयाची कामगिरी





**ठाणे :** भोपाळ येथील राष्ट्रीय बालरंग फेस्टिव्हल – २०२३ मध्ये सादर करण्यात आलेल्या पारंपरिक लोकनृत्यात महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती मांडणारे तारपा नृत्य लक्षवेधी ठरले आहे. आसनगाव येथील एस. व्ही. एम. पब्लिक स्कूल आणि एन. जे. बेलवले कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रसिकांची मने जिंकण्याबरोबरच महाराष्ट्राचा झेंडा बालरंग फेस्टिव्हलमध्ये उंचावला.

केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचा इंदिरा गांधी राष्ट्रीय मानव संग्रहालय विभाग आणि मध्य प्रदेश शिक्षण विभाग यांच्या वतीने भोपाळ येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय बालरंग फेस्टिवलमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी आसनगाव येथील विद्यालयाला मिळाली होती. या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संधीचे सोने करून आदिवासी संस्कृती व परंपरा मांडली. अनिश शेट्टी, भाविका पाटील, सायली निचिते, जय निचिते, उदय निचिते, अनुष्का घोडे, दुर्गा थापा, प्रफुल पाटील, तेजस्विनी खडके, चेतन पठारे, रुपेश मांगे, सम्यक अडसूळ, संघराज अडसूळ, सुरज डोंभरे, गौरव माळी या विद्यार्थ्यांनी 'तारपा'च्या माध्यमातून रसिकांची मने जिंकली. विशेष म्हणजे या स्पर्धेत कोणत्याही प्रकारची सीडी किंवा ऑडिओ म्युझिक वापरण्यास मनाई होती. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतः लाईव्ह संगीत वाजवून नृत्य सादर केले. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेचे संचालक अमोल एडगे, सहसंचालक रमाकांत काठमोरे, उपसंचालिका डॉ. नेहा बेलसरे, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर व ललिता दहितुले, शहापूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण, बालरंग फेस्टिवल महाराष्ट्र टीमचे मार्गदर्शक विक्रम अडसूळ, दीपक बेलवले, ज्योती बेलवले यांच्या मार्गदर्शनाखाली आसनगाव येथील एस. व्ही. एम. पब्लिक स्कूल आणि एन. जे. बेलवले कनिष्ठ महाविद्यालयाने ही उज्वल कामगिरी केली. शहापूर तालुक्यातील एस. व्ही. एम. पब्लिक स्कूल आणि एन. जे. बेलवले कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील मोगरे, शिक्षक अनिल सापळे, सोनाली धामोडे, नीता कमाने, दिलीप थोराड यांनी विद्यार्थ्यांची नृत्यासाठी तयारी करून घेतली होती.

# ठाणे विभागात ९ लाखांहून अधिक प्रवाशांनी खरेदी केली डिजिटल प्रणालीद्वारे तिकीटे

**ठाणे:** ''गाव तेथे एसटी'', ''रस्ता तेथे एसटी असे ब्रीद वाक्य असलेल्या एसटी बसमध्ये शहरी असो या ग्रामीण भागात सुट्ट्या पैशांवरून प्रवासी आणि वाहकांमधील वाद नित्यनियमाचा झाला होता. आता त्या वादाला पूर्णविराम मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने आधुनिकतेकडे एक पाऊल टाकत, एसटी बसमध्ये डिजीटल प्रणालीद्वारे प्रवाशांना प्रवासादरम्यानचे तिकीट युपीआय, क्यूआर कोड या सुविधांद्वारे उपलब्ध करून देण्यास सुरू केली आहे. त्या सुविधेला महामंडळाच्या ठाणे विभागात चांगला प्रतिसाद लाभताना दिसत आहे. दीड महिन्यात ९ लाखांहून अधिक प्रवाशांनी या प्रणालीद्वारे तिकीटे खरेदी केली आहेत. यामध्ये ठाण्यातील १ आणि २ या दोन आगारातून तब्बल ८ लाख ४३ हजार ५९५ प्रवाशांचा समावेश आहे. तर अजून पाहीजेल तसा ग्रामीण भागात प्रतिसाद लाभताना दिसत नाही.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एक पाऊल पुढे टाकत डिजीटल प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करता येईल, अशा सर्व वाहकांसाठी ॲण्ड्राईड तिकीट इश्यू मशिन्स नव्याने सेवेत दाखल झाले आहे. तरी सर्व प्रवाशांना नव्या मशिनमुळे प्रवासादरम्यान रोख पैशाऐवजी युपीआय, क्यूआर कोट, आदी डिजीटल पेमेंटचा वापर करत तिकीट काढता येणार आहे. प्रवासादरम्यान प्रवाशांना बसमध्ये तिकीट काढण्यासाठी , यासारख्या सुविधा प्रवाशांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. ठाणे विभागाच्या एकूण ८ विभागात ही सुविधा १ नोव्हेंबर २०२३ रोजी पासून ही उपलब्ध करून देण्यात आली. तेंव्हापासून १८ डिसेंबर पर्यंत या आठ ही आगारातून ९ लाख ६ हजार ६८५ जणांनी या प्रणालीद्वारे तिकीट खरेदी केली आहे. ठाणे १ आणि २ या आगारातून सर्वाधिक ८ लाख ४३ हजार ५९५ तिकीटीची विक्री झाली आहे. तर विठ्ठलवाडी पाठोपाठ मुरबाड, भिवंडी, कल्याण, वाडा आणि शहापूर या आगारांचा क्रमांक लागत असल्याचे आकडेवारी वरून दिसत आहे. या आधुनिक सुविधेचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन राज्य परिवहन ठाणे विभागाकडून करण्यात आले आहे.



## ठाणे-पुणे मार्गावर या प्रणालीला प्रतिसाद

**ठाणे शहरातील आगारातून ठाणे पुणे या मार्गावर धावणाऱ्या गाड्यांमध्ये या नव्या प्रणालीने तिकीट घेणारे प्रवासी जास्त आहे. ही संख्या ६० टक्के इतकी आहे. या प्रणालीने आता प्रवाशांना सोयीचे झाले आहे. त्यातच सुट्ट्या पैशांवरून होणारे वादाला पूर्णविराम मिळण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत. अशी माहिती सूत्रांनी दिली. नोव्हेंबर महिन्यात फक्त ठाणे १ मध्ये चांगला प्रतिसाद दिसून आला होता. पण, डिसेंबर महिन्यात इतर आगारात ही प्रतिसाद वाढताना दिसत आहे. पण ठाणे १ आणि २ मध्ये तिकीट खरेदीची संख्या लाखोंच्या घरात पोहोचली आहे.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १ जानेवारी २०२४ पान : ३



# आधी कामगारांची थकबाकी द्या मगच क्लस्टरचे काम

## भाजप आमदार संजय केळकर यांचा इशारा



**ठाणे:** गोरगरीब रहिवाश्यांना घरकुल देणाऱ्या मुख्यमंत्र्याचा महात्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या क्लस्टर योजनेत कामगारांवर अन्याय झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. क्लस्टरचे भूमिपूजन झालेल्या वागळे इस्टेट येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भूखंड क्रमांक एफ-२ या जमिनीवरील इंडियन रबर कंपनीच्या साडेचारशे कामगारांची कोट्यवधीची थकबाकी अद्याप मिळालेली नाही. तेव्हा, हतबल झालेल्या कामगारांनी रविवारी शासकिय विश्रामगृहात आमदार संजय केळकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. दरम्यान वृद्ध कामगारांनी दहा वर्षापूर्वी ही मुख्यमंत्री शिंदे यांनी आश्वासन दिल्याचे सांगितले. यावेळी आधी कामगारांची थकबाकी द्या, नंतरच क्लस्टरचे काम करा इशारा आमदार केळकर यांनी दिला आहे. याशिवाय मुख्यमंत्री याबाबत सकारात्मक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आशिया खंडातील ठाण्यातील सर्वात जूनी औद्योगिक वसाहत असलेल्या वागळे इस्टेट रोड नं २२ येथील एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड क्रमांक एफ - २ येथे १९६३ पासुन इंडियन रबर कंपनी होती.या कंपनीत ४६५ कामगार काम करीत, यापैकी ९० टक्के कामगार मराठी होते. सन १९८२ मध्ये प्रजासत्ताक दिनी कंपनी अचानक बंद करण्यात आल्याने सर्व कामगार देशोधडीला लागले. कुठलीही देणी न देता कामगारांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. लेबर कोर्ट हायकोर्ट यांनी कामगारांच्या बाजुने निकाल दिला. परंतु काहीच न्याय मिळालेला नाही. मागील ३५ वर्षात वारंवार मागण्या आणि निवेदने देऊन देखील अद्याप दमडीही मिळालेली नाही; दरम्यान, थकबाकी मिळण्याच्या प्रतिक्षेत आतापर्यंत या कंपनीतील २०० कामगार निधन पावले. पण थकबाकी मिळालेली नाही, आणि आता ही जागा क्लस्टरसाठी दिल्याने कामगार हतबल आणि संतप्त झाले आहेत. या कामगारांसाठी आमदार संजय केळकर सातत्याने लढा देत आहेत, प्रत्येक अधिवेशनात या कामगारांचा विषय आ. केळकर यांनी उचलला. तरीही अद्यापपावेतो या कामगारांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे, संतप्त झालेल्या कामगारांनी शनिवारी क्लस्टरच्या भूमीपूजना दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर रविवारी आमदार केळकर यांनाही साकडे घातले. त्यानुसार, रविवारी शासकिय विश्रामगृहात कामगारांची बैठक घेतली. या बैठकीत, आधी कामगारांची थकबाकी द्यावी, नंतरच क्लस्टरचे काम करा. असा सूचनावजा इशारा दिला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सर्वसामान्य कामगारांची व्यथा जाणुन सकारात्मक निर्णय घेतील असा आशावादही केळकर यांनी व्यक्त केला आहे.

या कंपनीच्या कामगारांनी शनिवारी क्लस्टरच्या भूमीपूजना दरम्यान मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन देऊन दिले. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे. दरम्यान, १० वर्षापुर्वी देखील शिंदे यांना निवेदन दिले होते. त्यावेळीही त्यांनी हेच आश्वासन दिले होते. असे या कंपनीचे वृद्ध कामगार शिवाजी सुकाळे यांनी सांगितले. तसेच, आमदार संजय केळकर सातत्याने पाठीशी उभे राहिल्या बद्दल ऋण व्यक्त केले.




# करदात्यांसाठी खुशखबर

## मालमत्ता करातील १००% व्याज माफीच्या अभय योजनेस १५ जानेवारी २०२४ पर्यंत मुदतवाढ

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेने मालमत्ता करातील १०० टक्के व्याज माफीच्या अभय योजनेस येत्या १५ जानेवारी २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. सदर व्याज माफी अभय योजनेचा ठाणेकर करदात्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.

यापूर्वी, महानगरपालिकेने १५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत अभय योजना जाहीर केली होती. त्याला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मात्र, नाताळच्या सुट्या असल्याने ज्यांना या योजनेचा लाभ घेता आला नाही, अशा नागरिकांनी मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी अभय योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या मुदतवाढीमुळे, जे करदाते दिनांक १५ जानेवारी २०२४ पर्यंत थकीत मालमत्ता कर चालू वर्षाच्या मागणीसह एकत्रित महापालिकेकडे जमा करतील अशा करदात्यांना त्यांच्या थकीत मालमत्ता करावर कराधान नियम ४१(१) अन्वये आकारलेल्या शास्तीत १०० % सवलत देण्यात येणार आहे.

### प्रभाग कार्यालयात संकलन केंद्रे

मालमत्ता कर भरण्यासाठी ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयात संकलन केंद्रे सुरू करण्यात आली असून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायं.५ तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी व सर्व शनिवार सकाळी १०.३० ते दुपारी ४ व रविवार सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत कराचा भरणा करता येईल.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच Google Pay, PhonePe, PayTm, BhimApp याद्वारे करदाते ऑनलाईन पध्दतीने त्यांचा मालमत्ता कर जमा करू शकतात. तरी ठाणे महापालिका क्षेत्रातील करदात्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# घोडबंदर रोडवर ऑईल टँकरचा अपघात


**ठाणे:** कोल्हापूर येथून गुजरात येथे ऑईल घेऊन जाणाऱ्या टँकर चालकाचा टँकर वरील ताबा सुटून ठाण्याकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या रोडवरती उलटला. हा अपघात गुरुवारी पहाटे सहा ते सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेत राजू नामक टँकर चालक जखमी झाला असून या अपघाताचा वाहतुकीवर परिणाम झाल्याचे पाहण्यास मिळाले. टँकर पलटी झाल्यामुळे पातलीपाडा सर्विस रोडवरील वाहतूक सुमारे सहा तास बंद होती. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १ जानेवारी २०२४
पान : ४
www.diwanews.com

# कोरोनानंतर ठाण्यात क्षयरोगाची संख्या वाढली

**ठाणे: ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात कोरोनानंतर पुन्हा क्षयरोगी रुग्णांची संख्या वाढण्यास सुरुवात झाली आहे. कोरोनामध्ये क्षयरोगी रुग्णांच्या तपासण्या कमी झाल्याने रुग्ण संख्येत ही घट झाल्याचे पाहण्यास मिळाले. त्यावेळी ६ हजार रुग्ण पुढे आले होते. मात्र २०२३ या वर्षात क्षयरोगाच्या तपासण्या वाढल्याने रुग्ण संख्येतही वाढ झाली. २०२३ च्या १ जानेवारीपासून ५ डिसेंबरपर्यंत ८ हजार ६८४ क्षयरोगी रुग्ण आढळून आले आहेत. विशेष आढळलेल्या रुग्णांमध्ये महिलांची प्रमाण हे ६० टक्के आहेत. तर, एकूण रुग्णांपैकी ७ हजार रुग्ण हे पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील रुग्ण आहेत. तसेच आढळून येणाऱ्या रुग्णांवर महापालिकेमार्फत मोफत औषधोपचाराबरोबर चाचण्याही केल्या जात असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली.**



## या वयोगटातील रुग्ण संख्या अधिक

**या वर्षी आढळून आलेल्या क्षयरोगी रुग्णांमध्ये ६० टक्के रुग्ण या महिला असून ४० टक्के रुग्ण पुरुष आहेत. तसेच आढळून येणाऱ्या रुग्णांमध्ये १६ ते ३६ वयोगटातील रुग्ण संख्या अधिक आहे. या रुग्णांम औषधाने तसेच त्या आजाराच्या प्रकारानुसार केलेला व्यायाम आणि वेळीच योग्य आहार घेतल्याने हा आजार नक्की बरा होतो.असे ही सूत्रांनी सांगितले.**

## ११ महिन्यात आढळले ८ हजार ६८४ रुग्ण

## महिलांचे प्रमाण ६० टक्के

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ठामपा कार्यक्षेत्रातील ६ लाख ९७ हजार लोकसंख्या असलेल्या अतिजोखमी परिसरात क्षय आणि कुष्ठरोग शोध मोहिम नुकतीच राबविण्यात आली. या मोहिमेत त्यांच्यामार्फत १ लाख ३९ हजार घरामध्ये जाऊन त्या पथकांनी तपासणी केल्यावर क्षयरोगाचे ४ हजार ७७७ संशयित रुग्ण पुढे आले होते. त्यापैकी ४ हजार ८० जणांची थुंकी आणि छातीचे एक्सरे अशा चाचण्या केल्या. त्यामध्ये नवे ७७ जण क्षयरोग बाधित असल्याचे स्पष्ट झाले. त्याचबरोबरीने कुष्ठरोग या आजाराच्या तपासणीत ३ हजार ३६९ जण कुष्ठरोग संशयित म्हणून पुढे आले होते. त्यांच्या केलेल्या चाचण्यांमध्ये नवे १० रुग्ण आढळले. तातडीने त्यांना उपचाराखाली आणले.

दरम्यान १ जानेवारी पासून ५ डिसेंबर या कालावधीत ठामपा कार्यक्षेत्रात ८ हजार ६८४ रुग्ण आढळले आहेत. ते रुग्ण तातडीने उपचाराखाली आले आहे. तर आढळणाऱ्या रुग्णांवर ठामपाकडून मोफत उपचार आणि सुविधा दिल्या जात आहे. एकूण रुग्णांमध्ये गतवर्षातील १० टक्के रुग्णांवर अजूनही उपचार सुरू असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली.

## या दिल्या जातात मोफत सुविधा

**या रुग्णांच्या बँक खात्यात दर महिन्याला ५०० रुपये जमा होतात.तर औषधांपूर्वी केलेल्या जाणाऱ्या चाचण्यांसह महागड्या चाचण्या ही खासगी रुग्णालयाच्या माध्यमातून मोफत केल्या जातात. तसेच रुग्णांचे आणि नातेवाईकांचे मोफत डिजिटल एक्सरे काढले जातत. याशिवाय प्रोटीन पावडर ही मोफत दिली जाते. येवढेच नाहीतर खासगी डॉक्टरांकडून अशा रुग्णांची माहिती मिळाल्यावर त्यांनाही ५०० रुपये दिले जातात. याशिवाय रुग्णांना औषधोपचार जाऊन देणाऱ्या आशावर्क यांनी ५०० रुपये देण्यात येत आहे.**

# अवैध मद्य विक्रीला प्रशासन घालतंय पाठीशी

## संरक्षण सेवांसाठी असलेल्या मद्याची अवैध विक्री

**ठाणे :** 'केवळ संरक्षण सेवांसाठी' असा मजकूर असलेली मद्य विक्री बेकायदेशीर असूनही ठाण्यातील वर्तकनगर परिसरात असलेल्या आरती वाईन्स मात्र खुलेआम या मद्याची अवैध विक्री करत आहेत. श्री. भाटकर यांनी हे मद्य खरेदी केले होते त्यावर फक्त डिफेन्स सर्विससाठी असा उल्लेख आढळल्यानंतर मनसे कार्यालयात संपर्क साधला. हि बाब गंभीर असल्या कारणाने सर्व पुराव्यासहित याबाबत ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे तक्रार केली होती मात्र ठोस कारवाई न झाल्यामुळे आठ दिवसात कायदेशीर कारवाई न केल्यास मनसे न्यायालयात जाईल, असा इशारा मनसे प्रभाग अध्यक्ष अमोल राणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.




## तक्रार करूनही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाईस टाळाटाळ

ठाण्यातील वर्तकनगर परिसरात आरती वाईन्स शॉप आहे. येथे विक्री करिता आलेले मद्य औरंगाबाद येथील वाळुंज एमआयडीसी येथील मे. ॲनहॅजर बुश इनबेव इंडिया लिमिटेड या कंपनीकडून तयार केले जात आहे. पण आरती वाईन्स शॉपला हे मद्य भिवंडी तालुक्यातील वडपे येथे असलेल्या मे. ओ.बी.इनबेव इंडिया प्रा. लिमिटेड यांच्याकडून पुरवठा केला जातो. बिअर कॅनवर 'केवळ संरक्षण सेवांसाठी' असा मजकूर असलेल्या मद्याची विक्री अनधिकृतपणे केली जात असल्याची राज्य उत्पादन शुल्क विभागाला तक्रार केल्यावर या विभागाने चौकशी केली असता औरंगाबादच्या मे. ॲनहॅजर बुश इनवेब इंडिया लिमिटेच्या चुकीमुळे केवळ संरक्षण सेवांसाठी असा कॅनवर सदोष मजकूर छापला गेला असल्याचे लेखी सांगण्यात आले. पण या सदोष मजकूर असलेल्या मद्याची विक्री करणाऱ्या मे. आरती वाईन्स दुकानदारास उत्पादन शुल्क विभाग पाठीशी घालत असल्याचा आरोप मनसेने केला आहे. विक्री करणाऱ्याची जबाबदारी निश्चित करून त्यावर कारावाई होणे अपेक्षित आहे.राज्य उत्पादन शुल्क व पोलिस प्रशासनाने अवैध मद्य विक्री तात्काळ थांबवावी, अशी सार्थ अपेक्षा करत विक्री करणाऱ्या दुकानाचा परवाना रद्द करावा अशी मागणी केली आहे. असा मजकूर असलेली मद्य विक्री करणे कायद्याने गुन्हा असतानाही राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईबाबत साशंकता निर्माण होत आहे . या दुकानावर येत्या ८ दिवसात कायदेशीर कारवाई केली नाही, तर मनसे न्यायालयात दाद मागेल असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

## मनसेची कारवाई करण्याची मागणी

# सर्वंकष स्वच्छता मोहीम लोकचळवळ व्हावी
## -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे






**ठाणे :- सर्वंकष स्वच्छता मोहीम ही लोकचळवळ व्हावी, हे अभियान मुंबई, मुंबई महानगर, एमएमआरडी क्षेत्र असे टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यभर राबविण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील सर्वंकष स्वच्छता मोहिमेची ठाण्यातील सुरूवात आज वागळे प्रभाग समिती कार्यक्षेत्रातून करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या मोहिमेत मुख्यमंत्री स्वतः सहभागी झाले होते.**

यावेळी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी नगरसेवक अशोक वैती, एकनाथ भोईर, योगेश जानकर, डॉ. जितेंद्र वाघ, एकता भोईर, संध्या मोरे, शिल्पा वाघ, मनिषा कांबळे, महापालिकेचे अधिकारी -कर्मचारी, ठाणे शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ, भजनी मंडळे, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, अनिरुद्ध बापू सेवा मंडळ, संत निरंकारी सेवा मंडळ, स्वामी समर्थ सेवा मंडळ, विविध महाविद्यालयांचे एन.एस.एस, एन.सी.सी चे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी यांनीही आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ठाण्यातील प्रदूषण तुलनेने कमी असून ते आणखी कमी करण्यासाठी जिथे जिथे जागा मिळेल तेथे झाडे लावून हरित पट्टे तयार करावेत जेणेकरुन ऑक्सिजन पार्क तयार होतील. तसेच मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड करुन शहरात जंगले तयार करावीत. त्यामुळे हवेतील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. जिथे स्वच्छता असेल तेथे लोक कचरा टाकत नाहीत. आज बीएमसी पाईपलाईन येथे साठलेला कचरा साफ केला जातो आहे, त्याठिकाणी ग्रीन पॅच तयार करुन तो परिसर हिरवागार करा, जेणेकरुन त्याचे दृश्य स्वरुप नागरिकांना दिसेल.

ठाण्यातील वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना होवू नये, यासाठी वाहतुकीचे नियोजन करावे. त्याचप्रमाणे फेरीवाल्यांना हॉकर्स झोनमध्ये जागा उपलब्ध करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. स्वच्छता अभियानाचे ठाणे महानगरपालिकेने केलेले नियोजन हे उत्कृष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विशेषतत्वाने नमूद केले. त्यांनी यावेळी जयेश गायकवाड व अनिता शिरसाट या सफाई कर्मचाऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात सन्मान केला.

मुख्यमंत्री शिंदे यांनी तीन हात नाक्यावरुन मॉडेला नाका मार्गे वागळे मुख्य रस्ता, १६ नं. येथील बीएमसी पाईपलाईनवरील पूल, रोड नं. २१, रोड नं २२ येथील शिवसेना शाखा येथून चालत सर्व ठिकाणी सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वत:ही काही ठिकाणी रस्त्यांची सफाई केली तसेच फूटपाथवर पाण्याची फवारणी करुन फूटपाथ स्वच्छ केले.

या अभियानात सहभागी झालेल्या भजनी मंडळ, स्वच्छता स्वयंसेवक, ज्येष्ठ नागरिक संघ, एन.सी.सी, एन.एस.एस, शालेय विद्यार्थी तसेच विविध धार्मिक संस्थामार्फत सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना भेट देवून त्यांच्याशी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी संवाद साधला.

सर्वंकष स्वच्छता अभियानाच्या नियोजनाबाबत ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, आज वागळे इस्टेट प्रभागापासून या मोहिमेचा प्रारंभ झाला असून दर शनिवारी एक याप्रमाणे २४ फेब्रुवारी २०२४ पर्यत प्रत्येक प्रभाग समितीत हे अभियान राबविले जाणार आहे. या अभियानात मार्केट, गल्ल्या, बसस्थानके, फूटपाथ, दुभाजक, नाले, मैदाने, कचरा जमा होणारी ठिकाणे, विसर्जन घाट अशा सर्व सार्वजनिक ठिकाणांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानात एकूण २ हजार ५०० महापालिकेचे कर्मचारी, १ हजार ७९७ स्वच्छता कर्मचारी, विविध संस्थाचे स्वयंसेवक असे ५ हजारांहून जास्त मनुष्यबळ या अभियानात सहभागी झाले असून त्यांच्यामार्फत सफाई केली जात आहे. सफाईसाठी लागणारी सर्व यंत्रसामुग्री, पाण्याचे टॅंकर, प्रथमोचाराची साधने, ॲम्ब्युलन्स अशा सेवा त्यांना पुरविण्यात आल्या आहेत.

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी




आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

# धोकादायक इमारतींमधील लोकांना त्यांच्या हक्काच्या चांगल्या घरात नेईन तो दिवस माझ्यासाठी महत्त्वाचा -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**ठाणे :–** धोकादायक इमारतींमधील लोकांना त्यांच्या हक्काच्या चांगल्या घरात नेईन तो दिवस माझ्यासाठी महत्त्वाचा असून गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास मुख्यमंत्री या नात्याने मी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

२२ नंबर सर्कल, किसननगर या भागातील यु.आर.सी. क्र.१ व २ येथे आशिया खंडातील सर्वात मोठ्या महत्वाकांक्षी नागरी पुनरुत्थान (क्लस्टर) पुनर्विकास योजनेतील नवीन प्रकल्पाचे भूमीपूजन त्याचबरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, येऊर येथील नेचरपार्क व इतर विविध विकास कामांचा ई-शुभारंभ मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव, मुख्य वनसंरक्षक के. प्रदीपा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे संचालक श्री. मल्लिकार्जुन, ठाणे महानगर पालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल दिघीकर, सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी व प्रशांत रोडे, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे आणि माजी नगरसेवक, नगरसेविका, आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, कस्टरसाठी अनेक संघर्ष करावे लागले. साईराज बिल्डिंगची दुर्घटना अजूनही लक्षात आहे. त्यातील १८ जण मृत्युमुखी पडले, ही घटना माझ्या मनाला चटका लावून गेली. धोकादायक इमारती सर्वांनाच काळजी टाकणाऱ्या असतात. या पार्श्वभूमीवर ही योजना राबविण्याचा संकल्प केला. काही इमारती अनधिकृत जरी असल्या तरी त्यातील जिवंत माणसे, त्यांचा जीव महत्त्वाचा, ही माणुसकीची भावना महत्त्वाची, या भावनेतूनच क्लस्टर योजनेचा जन्म झाला. क्लस्टर योजनेत काही त्रुटी होत्या मात्र देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना त्या त्रुटी दूर करण्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले. महापालिका आयुक्त, सिडको व्यवस्थापकीय संचालक, जिल्हाधिकारी आणि वनविभाग यांनी संयुक्तपणे ही योजना यशस्वीपणे पूर्णत्वास आणावी.

ते म्हणाले, या योजनेतील पुढील टप्प्यातील कामांकरिता आपल्याला वेगवेगळे भूखंड मिळत आहेत. क्लस्टर पुनर्विकास योजनेच्या पहिल्या टप्प्यात साडेदहा हजार घरांचे काम पूर्णत्वास जाणार आहे, पुढील काम हे दोन टप्प्यातच पूर्ण करण्याचे मी निर्देश दिले आहेत. क्लस्टर योजनेसाठी पूर्वी काम केलेल्या कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पंधराशे हेक्टर भूखंडावर होणारा हा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प भारतातीलच नव्हे तर आशियातील पहिला इतका मोठा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण समाजासाठी जगणे, ही होती. हीच शिकवण घेवून मी आता जगतोय. मुख्यमंत्रीपदाचा उपयोग सर्वसामान्यांचे जीवन बदलण्यासाठी करण्याचा प्रयत्न करतोय.

डीप क्लीन ड्राईव्ह विषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, हे अभियान यशस्वी होण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात हे अभियान राबविले जाणार आहे आणि हे केवळ एक-दोन दिवसासाठी नव्हे तर नियमितपणे राबविले जाणार आहे. सर्वांनाच नियमित स्वच्छतेची सवय व्हायला हवी.

केंद्र सरकारच्या मदतीमुळे राज्यातील अनेक प्रकल्प मार्गी लागत आहेत, याबद्दल केंद्र शासनाचे आभार मानून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, ‘‘आनंदवन’’ ही संकल्पना मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त अशी संकल्पना आहे. या योजनेंतर्गत ठाण्यातील पहिल्या टप्प्यात २७ किलोमीटर आणि ५०० मीटर रुंदीचा श्रीनगर ते गायमुख या भागात हा प्रकल्प राबविला जाणार आहे. या माध्यमातून जास्तीत जास्त वृक्षारोपण, ग्रीन पॅच, ऑक्सिजन पार्क, अर्बन फॉरेस्ट हे उपक्रम राबविले जाणार आहेत. शासनाकडून राज्यात बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. या प्रकल्पात बांधकाम करणाऱ्या शिर्के कन्ट्रक्शन कंपनीचे कौतुक करताना मुख्यमंत्र्यांनी त्यांना सांगितले की, लोकांना कमीत कमी वेळेत उत्तम दर्जाची घरे बांधून द्यावीत. नुसत्या इमारती उभ्या न करता नियोजित शहर निर्माण करायचे आहे. येथील लोकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा मिळायला हव्यात. क्लस्टर हा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा असून गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास मुख्यमंत्री या नात्याने मी कटिबद्ध असून आनंदवन, क्लस्टर आणि डीप क्लीन ड्राईव्ह या अभियानाचा परिणाम निश्चितच येत्या काळात सकारात्मक आणि विकासात्मक दृष्टीने दिसून येईल. भविष्यात ठाण्यातील व राज्यातील इतर शहरांचाही क्लस्टर पुनर्विकासाच्या माध्यमातून विकास केला जाईल. सर्वांच्या सहकार्याने ठाणे शहर, ठाणे जिल्हा अन् राज्याचाही सर्वांगीण विकास करावयाचा आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रास्ताविक करताना क्लस्टर पुनर्विकास योजनेबद्दलची माहिती सांगितली. तसेच **आनंदवन** आणि **क्लस्टर समूह विकास योजना** याबाबतची चित्रफीत दाखविण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त १४ ते २८ जानेवारी

**मुंबई–** राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने राज्यात येत्या १४ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यातील केंद्र सरकार तसेच राज्य शासनाच्या राज्यस्तरीय, विभागीय आणि जिल्हास्तरीय शासकीय आणि अधिनस्त कार्यालयांनी मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना मराठी भाषा विभागामार्फत करण्यात आली आहे.

या कालावधीत सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेसंबंधी परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिर, कवीसंमेलन, नाट्य, घोषवाक्य, अभिवाचन, कथाकथन, पुस्तकांचे रसग्रहण, वादविवाद यांसारख्या स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने अभिजात ग्रंथांचा परिचय करून देण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करावे. याशिवाय मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता विविध माध्यमांतून याबाबतचे दृक श्राव्य संदेश प्रसारित करावेत. ग्रंथ प्रदर्शन, दिंडी, पुस्तक भेट देणे, पुस्तक जत्रा, समाजमाध्यमांवर मराठी वाचन कट्टा आदी उपक्रम आयोजित करण्यात यावेत, असे या अनुषंगाने काढलेल्या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.




मराठी भाषेच्या प्रसार प्रचारासह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी अनुवाद लेखन, व्यावसायिक लेखन, पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया, स्व-प्रकाशन, ई बुक, ऑनलाईन विक्री, लेखक प्रकाशक करार, संहिता लेखन, लघुपट, माहितीपट लेखन आदी विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशीही सूचना करण्यात आली आहे.

भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळांबद्दलची माहिती भाषा पंधरवड्याच्या निमिताने शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्याबरोबरच महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, कोकण मराठी साहित्य परिषद, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, मुंबई मराठी साहित्य संघ आदी साहित्य सस्थांची मदत घेता येणार असल्याचे मराठी भाषा विभागाने स्पष्ट केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १ जानेवारी २०२४ पान : ७
www.diwanews.com

# प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना गती द्यावी – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** ‘म्हाडा’च्या माध्यमातून मुंबई परिसरात गृहनिर्माण पुनर्विकासाचे विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबईतील या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गृहनिर्माण विभागाची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते.



या बैठकीस गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, गृह विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गृहनिर्माण विभागाशी संबंधित शासनाकडे प्रलंबित असलेले विषय तातडीने मार्गी लावावेत. गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत ठेवण्यात यावा. कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात कामे अधिक वेगाने करावीत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येथील आदिवासी व अतिक्रमित झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी ‘म्हाडा’ व नगरविकास विभागाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच मुंबईतील ‘म्हाडा’च्या मालकीच्या जागेवर असलेल्या २७ पोलीस वसाहतींचा विकास म्हाडामार्फत करण्यात यावा, असे निर्देश यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संबंधितांना दिले.

सायन-कोळीवाडा येथील १२०० सदनिका पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. एलआयसी कॉलनी पुनर्विकासाबाबत म्हाडाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच ९१(अ) अंतर्गत रखडलेल्या प्रकल्पाबाबत प्राप्त प्रस्तावांना म्हाडाने गती द्यावी, अशा सूचना यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संबंधितांना दिल्या.

# रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या फळ पीक विम्याचे पैसे ३ जानेवारी पूर्वी अदा करावे – कृषीमंत्री मुंडे



मुंबई : पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे पैसे व्याजासह ३ जानेवारीपूर्वी अदा करावेत, असे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील तळा महसूल मंडळातील ७५०० शेतकऱ्यांनी पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ३५०० शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे. मात्र, महसुली मंडळाच्या विभाजनाच्या तांत्रिक मुद्द्यावरून भारतीय कृषी विमा कंपनीने २९४० शेतकऱ्यांची ९ कोटी रुपये नुकसान भरपाईची रक्कम अदा केलेली नाही.

त्यासंदर्भात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या पुढाकाराने आज मंत्रालयात कृषी मंत्री श्री. मुंडे यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीत मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, कृषी आयुक्त प्रवीण गेडाम दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले. तसेच भारतीय कृषी पीक विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक एम. एस. सावंत, कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री कु. तटकरे यांनी कोकणातील इतर जिल्ह्यांपेक्षा रायगड जिल्ह्यात फळ पीक विम्याच्या हप्त्याची रक्कम मोठी असल्याकडे लक्ष वेधले. त्यावर कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी पुढील हंगामात हप्त्याची रक्कम सर्वत्र समान करण्याची सूचना कृषी आयुक्तांना केली. यानंतर कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी आंदोलकांना उपोषण मागे घेण्याचे विनंती केली. त्यानुसार उपोषण मागे घेण्यात आले.

# सावंतवाडी रेल्वे टर्मिनसच्या पूर्णत्वासह रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्य केल्या प्रवासी संघटनेच्या मागण्या

## मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रयत्नांना यश

**नवी दिल्ली :** शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची बुधवारी नवी दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी मंत्री श्री.वैष्णव यांनी मंत्री श्री.केसरकर यांच्या सावंतवाडी रेल्वे टर्मिनस पूर्ण करणे, केंद्र सरकारच्या ‘अमृत भारत स्टेशन’ आणि ‘वन स्टेशन वन प्रॉडक्ट’ योजनेमध्ये सावंतवाडी स्थानकाचा समावेश करणे, सावंतवाडी स्थानकामध्ये पूर्ण वेळ पॅसेंजर रिझर्वेशन सिस्टिम सुविधा सुरू करणे आदींसह विविध रेल्वेगाड्यांना सावंतवाडी येथे थांबा देणे अशा सर्व मागण्या तत्त्वतः मान्य केल्या व याबाबत कार्यवाहीच्या सूचना रेल्वे प्रशासनास दिल्या. कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या (केआरपीए) मागण्यांच्या अनुषंगाने मंत्री श्री. केसरकर यांनी मंत्री श्री.वैष्णव यांच्याकडे याबाबतची विनंती केली होती.

सावंतवाडी येथे रेल्वे टर्मिनसच्या दुसऱ्या टप्प्याचे काम निधीअभावी थांबले आहे. यासाठी आवश्यक असलेला नऊ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून कामाला गती द्यावी, अशी विनंती मंत्री श्री.केसरकर यांनी केली होती. यास रेल्वेमंत्री श्री. वैष्णव यांनी तत्त्वतः मान्यता दिली आहे. कोकणातील प्रवाश्यांना अधिक चांगली सुविधा मिळावी यादृष्टीने सावंतवाडी स्थानकाचा केंद्र सरकारच्या ‘अमृत भारत स्टेशन’ आणि ‘वन स्टेशन वन प्रॉडक्ट’ योजनेमध्ये समावेश करण्यात यावा, या मागणीला देखील तत्काळ प्रतिसाद देत श्री.वैष्णव यांनी मान्यता दिली. सर्व प्रवाशांबरोबरच विशेषत: ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाश्यांच्या सोयीसाठी उपयुक्त ठरणारी पूर्ण वेळ पॅसेंजर रिझर्वेशन सिस्टिम सावंतवाडी स्थानकावर सुरू करण्यास देखील त्यांनी होकार दर्शविला.

याशिवाय गाडी क्रमांक २२६५३, २२६५४, २२६५५, २२६५६ यांना सावंतवाडी स्थानकावर थांबा देणे, मुंबई – मंगलोर एक्सप्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस – मंगलोर मत्स्यगंधा एक्सप्रेस, मुंबई मडगाव वंदे भारत एक्सप्रेस, एर्नाकुलम हजरत निझामुद्दीन मंगला एक्सप्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस – त्रिवेंद्रम नेत्रावती एक्सप्रेस, एर्नाकुलम – हजरत निझामुद्दीन सुपरफास्ट एक्सप्रेस (साप्ता.), त्रिवेंद्रम – हजरत निझामुद्दीन सुपरफास्ट एक्सप्रेस (साप्ता.), एर्नाकुलम – अजमेर मरूसागर एक्सप्रेस (साप्ता.), लोकमान्य टिळक टर्मिनस – करमाळी एसी सुपरफास्ट एक्सप्रेस (साप्ता.), एर्नाकुलम – ओखा एक्सप्रेस या गाड्यांना सावंतवाडी स्थानकावर नियमित थांबा देण्याची विनंती देखील मंत्री श्री.वैष्णव यांनी मान्य केली. सावंतवाडी स्थानकावरून चांगले उत्पन्न असताना देखील नागपूर – मडगाव स्पेशल एक्सप्रेसचा रद्द केलेला सावंतवाडी स्थानकावरील थांबा तत्काळ सुरू करण्यात यावा, या मागणीला देखील सकारात्मक प्रतिसाद देत रेल्वेमंत्री श्री.वैष्णव यांनी ही मागणी मान्य केली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १ जानेवारी २०२४ पान : ८
www.diwanews.com

## महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२४ ची ७.८९ टक्के दराने परतफेड

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ७.८९ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२४ ची परतफेड ३१ जानेवारी २०२४ पर्यंत करण्यात येणार आहे, असे वित्त विभागाने कळविले आहे. ७.८९ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची ३० जानेवारी, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह ३१ जानेवारी, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल. शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल.

